# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६५१४३

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in


**तातडीचे /महत्वाचे**

जा. क्र.तंशिसं/विकाना/एनएसपी/२०१९/3024

दिनांक :- - 7 OCT 2019

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी संस्था
नागपूर विभाग

विषय : सन २०१९-२० साठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील केंद्र शासन पुरस्कृत गणुवत्ता निःसाधन शिषवृत्ती (Merit cum means Based Scholarship) योजना अमंलबजावणी बाबत

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १८/तांशिस/एमसीएम/२०१९/८८९ दिनांक ७/१०/२०१९

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलद्वारे राबविण्यात येणा-या केंद्र शासनाच्या योजना अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन संस्था नोंदणीबाबत व संस्थेकडुन रजिस्ट्रेशन अर्ज भरुन आणि मंजूर करुन घेण्याचे कार्यवाही बाबत तसेच संस्थांनी केद्र शासन पुरस्कृत गुणवत्ता निःसाधन शिष्यवृत्ती (Merit cum means Based Scholarship) योजनेसाठी विद्यार्थ्याकडुन अर्ज भरुन घेण्याबाबतची व तपासणी करण्याची कार्यवाही तातडीने करुन घेण्याबाबत संदर्भाकिंत पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी ज्या संस्थांनी सदर कार्यवाही पुर्ण केलेली नाही त्यांनी रजिस्ट्रेशनची तातडीने आठ दिवसाचे आत कार्यवाही करावी, उपरोक्त कार्यवाही पुर्ण् न केलेल्या संस्थेमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध योजनाकरीता जर अर्ज करता आला नाही तर त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

तरी सदर योजनामध्ये आपल्या संस्थेतील विद्यार्थ्याकडुन अर्ज दिनांक ३१/१०/२०१९ पर्यत ऑनलाईनरित्या भरुन घेण्याबाबत व संर्व संस्थांनी विद्यार्थ्यांचें प्राप्त अर्ज प्रलंबित न ठेवता ऑनलाईनरित्या तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

(डॉ.राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail:desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


ईमेलद्वारे-

अ.शा.पत्र क्रमांक : १८/तशिसं/एमसीएम/२०१९/४४७

दिनांक :- ०७/१०/२०१९.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक तथा नोडल ऑफीसर

**विषय :- सन २०१९-२० साठी** National Scholarship Portal **वरील केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती** ( Merit cum Means Based Scholarship ) **योजना अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र /MCM/२०१९/३४० दि. २०/०७/२०१९
२. या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र /MCM/२०१९/३८२ दि. ०९/०८/२०१९
३. या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र /MCM/२०१९/३९३ दि. २३/०८/२०१९

प्रिय श्री निबुदे,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलद्वारे (NSP) राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून संस्था नोंदणीबाबत व संस्थांकडून रजिस्ट्रेशन अर्ज भरुन आणि मंजूर करुन घेण्याच्या कार्यवाहीबाबत तसेच संस्थांनी **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( Merit cum Means Based Scholarship ) योजनेसाठी** विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्याबाबतची व तपासणी करण्याची कार्यवाही तातडीने करुन घेण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १,२ व ३ अन्वये सूचना दिलेल्या आहेत.

उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली Implementation of Scholarship Schemes for Students of Minority Communitites through NSP या संदर्भात दि.०४/१०/२०१९ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये मा. मुख्य सचिव यांनी सदरची कार्यवाही संथगतीने सुरु असल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

तरी, नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर (NSP) संस्था रजिस्ट्रेशनबाबत अत्यंत कमी प्रतिसाद असल्यामुळे, आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना बोलावून ज्या संस्थांकडून नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर (NSP) अद्याप संस्था रजिस्ट्रेशन अर्ज भरुन मंजूरी घेतलेली नाही अशा संस्थांना सदर कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याबाबत सुचित करण्यात यावे व त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास आठदिवसाच्या आत सादर करण्यात यावे. उपरोक्त कार्यवाही पुर्ण न केलेले संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना National Scholarship Portal वर उपलब्ध योजनेकरिता जर अर्ज करता आला नाही तर त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील या बाबत देखील सुचित करावे.

तसेच, सदर योजनामध्ये विद्यार्थ्यांकडून अर्ज दि. ३१/१०/२०१९ पर्यंत ऑनलाईनरित्या भरुन घेण्याबाबत व संस्थांनी विद्यार्थ्यांचे प्राप्त अर्ज प्रलंबित न ठेवता ऑनलाईनरित्या तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याबाबत कळविण्यात यावे.

आपला स्नेहांकित,

( डॉ. अभय वाघ. )
संचालक तथा नोडल ऑफीसर

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपुर.